॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.कबचौउमवि/७-क/शिक्षणशास्त्र/२९४७/२०२६ दिनांक:- २८/०९/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य, / प्राचार्या,
कबचौउमविशी संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये यांना...

**विषय :-** माहे- ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२६ (परीक्षा हिवाळी, २०२६) मध्ये होणाऱ्या B.Ed. अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता अध्यादेश ६७ नुसार अतिरीक्त संधीबाबत.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयान्वये आपण आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे माहे- ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२६ (परीक्षा हिवाळी, २०२६) मध्ये होणाऱ्या **B.Ed.** अभ्यासक्रमाच्या परीक्षेस प्रविष्ठ होणेसाठी अतिरीक्त संधी मिळणेकरीता विनंती अर्ज विद्यापीठास सादर केलेले आहेत.

त्या अनुषंगाने, प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, खालील तक्ता - **" अ "** मध्ये नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना अध्यादेश ६७ मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरू महोदयांनी माहे- ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२६ (परीक्षा हिवाळी, २०२६) मध्ये होणा-या परीक्षेसाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना संधी मंजूर केलेली नाही त्यांची नावे तक्ता **" ब "** मध्ये नमूद केलेली आहेत. सदर बाब संधी प्राप्त विद्यार्थ्यांच्या निर्दशनास त्वरीत आणून देवून, त्यांचे परीक्षा अर्ज नियमीत परीक्षा शुल्क + (अधिक) अतिरीक्त परीक्षा शुल्क एक व दोन विषयांसाठी रु. १३००/- आणि दोन पेक्षा जास्त विषयांसाठी प्रती विषय रू. ६५०/- या प्रमाणे परीक्षा शुल्क स्विकारून महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याचे परीक्षा अर्ज विद्यापीठ कार्यालयात **दि. ०५/१०/२०२६** पर्यंत जमा करावेत. सदर परीक्षा अर्जासोबत त्या अभ्यासक्रमाच्या सर्व वर्गाच्या आजतागायत मिळालेल्या गुणपत्रकांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. **दि. ०५/१०/२०२६** नंतरचे प्राप्त होणारे संधीचे परीक्षा अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत व या संदर्भात पत्रव्यवहार ही केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच,जुन्या अभ्यासक्रमाच्या सर्व संधी संपल्या असल्याकारणाने सदर अनुत्तीर्ण विषयांसाठी, नविन अभ्यासक्रमातील समकक्ष विषयांची परीक्षा देणे विद्यार्थ्यांना बंधनकारक व क्रमप्राप्त आहे. जे विद्यार्थी जुन्या अभ्यासक्रमातील Annual Pattern चे आहेत त्यांनी नवीन अभ्यासक्रमातील सेमिस्टर पॅटर्नच्या दोन्ही सत्रांच्या संबंधित/समकक्ष दोन्ही विषयांची परीक्षा देणे अनिवार्य राहील. तसेच सदर विद्यार्थ्यांना ज्या विषयांसाठी परीक्षा देणेकरीता अतिरीक्त संधी मान्य केलेली आहे त्या विषयाचा समकक्ष विषय माहे- ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२६ (परीक्षा हिवाळी, २०२६) च्या परीक्षेतील वेळापत्रकात नमूद असणे आवश्यक आहे. सदर बाबीची विद्यार्थ्यांने व महाविद्यालयाने आपल्या स्तरावर खात्री करूनच संधीचे परीक्षा अर्ज भरावेत व **दि. ०५/१०/२०२६** पावेतो विद्यापीठास सादर करावेत ही नम्र विनंती.

**सोबत :- संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांची यादी - तक्ता " अ "**
**संधी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी - तक्ता " ब "**

आपला विश्वासू,

(प्रा. योगेश ना. पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Exam .Education/ Mercy Chance

परीक्षा शिक्षणशास्त्र विभाग

दिनांक:- २८/०९/२०२६

**माहे, ऑक्टोबर/नोव्हेंबर,-२०२६ (परीक्षा हिवाळी, २०२६) B.Ed. च्या परीक्षेकरीता संधी मिळणेबाबत**

## तक्ता " अ " संधी मान्य केलेल्या विद्यार्थ्यांची यादी

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग / PRN. | महाविद्यालयाचे नाव | नापास विषय |
|---|---|---|---|---|
| 1 | पाटील रिमा जिजाबराव | B.Ed. PRN. 2015015400467751 | श्री.मं.बहु. क्रि. मं. छत्रपती राजे संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव | 01 |

## तक्ता " ब " संधी नाकारलेल्या विद्यार्थ्यांची यादी

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग / PRN. | महाविद्यालयाचे नाव | नापास विषय |
|---|---|---|---|---|
| 1 | मोरे पंकज रामलाल | B.Ed. PRN. 2014015400468173 | नगांव एज्यु. सोसायटीचे गंगामाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नगांव | 13 |
| 2 | मोरे मयुर भिमसिंग | B.Ed. PRN. 2011015400467622 | नगांव एज्यु. सोसायटीचे गंगामाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नगांव | 10 |
| 3 | मोरे सिमा भिमसिंग | B.Ed. PRN. 2011015400917724 | नगांव एज्यु. सोसायटीचे गंगामाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नगांव | 03 |
| 4 | धुमाळे प्राची रामदास | B.Ed. PRN. 2011015400467305 | नवलभाऊ प्रतिष्ठान संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अमळनेर | 03 |

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University ★ Jalgaon-425001 ★

(प्रा. योगेश ना. पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Exam .Education/ Mercy Chance